दैनिक
# विवेक सिंधु

बीड जिल्हा | रविवार, दि.13 सप्टेंबर 2026 | viveksindhu@gmail.com | वर्ष 46 वे | अंक क्र.143 | पाने 4 | किंमत : 2 रु.



## गणपतीत वरुणराजा बरसणार

मुंबई – राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे शेतकरी आणि नागरिकांची चिंता वाढली होती. अनेक भागांत अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप पिकांवर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. मात्र आता हवामान विभागाने राज्यासाठी दिलासा देणारा अंदाज जाहीर केला आहे. पुढील काही दिवस महाराष्ट्रातील अनेक भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, काही जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात अद्याप मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झालेला नाही. सध्या निर्माण झालेल्या पोषक वातावरणामुळे राज्यात १२ ते १४ सप्टेंबर या काळात पावसाची शक्यता आहे. विशेष म्हणजे १५ सप्टेंबरपासून पावसाचा जोर अधिक वाढेल, असा अंदाज आहे. यामध्ये मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, नाशिकसह संपूर्ण मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत मेघगर्जनेसह आणि

▸ पान 3 वर

# मनोज जरांगेंचा एल्गार, 15 सप्टेंबरला मुंबईकडे कूच करणार

### ▸ पाटोदा-खोपोलीमार्गे थेट आझाद मैदानात आमरण उपोषण



मुंबई – मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी आणि सगेसोयरे तसेच कुणबी प्रमाणपत्रांच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा 'चलो मुंबई'चा नारा दिला आहे. आपल्या आमरण उपोषणाच्या 15व्या दिवशी अंतरवाली सराटी येथे झालेल्या राज्यव्यापी बैठकीत त्यांनी मुंबईला जाण्याचा सविस्तर मार्ग, मुक्काम आणि आंदोलनाची संपूर्ण रणनीती जाहीर केली. "ही मराठ्यांची अंतिम आणि निर्णायक लढाई असून, आपण शांततेच्या मार्गाने मुंबईत जाऊन जिंकूनच माघारी येणार आहोत," असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुंबईत गेल्यावर मराठा महिलांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे यांच्या घरी हळदी-कुंकवासाठी जावे, असे आवाहन जरांगे यांनी केले. "हळदी-कुंकू लावताना त्यांना सांगा की, साहेबांना सांगा आम्हाला आरक्षण द्या. त्या जर बाहेर आल्या नाहीत तर जगभरात ब्रेकिंग न्यूज होईल आणि जर आल्या, तर सौभाग्याच्या लेण्याची इज्जत म्हणून त्या स्वतः नवऱ्याला आरक्षण द्यायला सांगतील. यामुळे सरकारची मोठी पंचायत होईल," असा राजकीय टोला त्यांनी लगावला. जे नोकरदार, व्यावसायिक आणि शेतकरी मुंबईला येऊ शकत नाहीत, त्यांनी आंदोलकांच्या मार्गावर सहकुटुंब उभे राहून त्यांना आशीर्वाद द्यावा आणि मुंबईला जाण्यासाठी निरोप द्यावा. तसेच, ज्यांच्याकडे चारचाकी गाड्या आहेत, त्यांनी आंदोलकांना मुंबईच्या वेशीपर्यंत सोडून माघारी यावे. "तुमचे काही हजार रुपयांचे डिझेल समाजाच्या लेकरांचे आयुष्य घडवेल," अशी भावनिक साद त्यांनी घातली.

▸ पान 3 वर

## एसटी कर्मचाऱ्याने गळफास घेत संपविले जीवन



बीड: आष्टी राज्य परिवहन महामंडळाच्या आगारात चालक म्हणून सेवा बजावणाऱ्या एका ४६ वर्षीय कर्मचाऱ्याने बसस्थानकातील विश्रांती कक्षात गळफास घेऊन जीवन संपवल्याची धक्कादायक घटना आज, शनिवारी (दि. १२) पहाटे समोर आली आहे. अन्सार हबीब शेख (वय ४६, रा. साबलखेड, ता. आष्टी) असे मृत चालकाचे नाव आहे. बसस्थानकाच्या आवारातच कर्मचाऱ्याने टोकाचे पाऊल उचलल्याने एसटी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अन्सार शेख हे २०१० पासून आष्टी आगारात चालक म्हणून प्रामाणिकपणे सेवा बजावत होते. शुक्रवारी रात्री ते नेहमीप्रमाणे बसस्थानकातील चालक व वाहकांसाठी असलेल्या विश्रांती कक्षात गेले आणि त्यांनी दरवाजा आतून बंद करून घेतला. शनिवारी पहाटेच्या सुमारास नाशिक-तुळजापूर मार्गावरील बसचे चालक गाडी घेऊन आष्टी बसस्थानकात आले. काही वेळ विश्रांती घेण्यासाठी ते कक्षाजवळ गेले असता दरवाजा आतून बंद अस आढळले. वारंवार दरवाजा ठोठावूनही आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

## अंबाजोगाईत स्लॅब भरताना विजेचा धक्का लागून दोन मजुरांचा दुर्दैवी अंत




अंबाजोगाई: शहरातील हनुमान नगर येथे एका शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या स्लॅबचे काम सुरू असताना काँक्रीट भरणाऱ्या यंत्राचा (बूम) ११ केव्ही उच्च दाबाच्या वीज वाहिनीला स्पर्श झाल्याने दोन बांधकाम मजुरांचा विजेचा तीव्र धक्का लागून मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना पंचायत समितीसमोरील मुख्य रस्त्यावर दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली असून, बबन चंद्रकांत वाघमारे आणि यशवंत कोंडीराम वाघमारे अशी या दुर्घटनेत प्राण गमावलेल्या दुर्दैवी मजुरांची नावे आहेत. या घटनेमुळे शहरात मोठी हळहळ व्यक्त होत असून मजुरांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पंचायत समितीसमोर एका शॉपिंग कॉम्प्लेक्सचे बांधकाम सुरू आहे. दुसऱ्या मजल्याच्या स्लॅबची भराई करण्यासाठी काँक्रीट भरणारे वाहन (एमएच ४४ एसक्यू ३०४४) मुख्य रस्त्यावर उभे करण्यात आले होते. या यंत्राद्वारे तीस फूट उंचावर काँक्रीट टाकले जात असताना यंत्राच्या पाईपचा स्पर्श रस्त्यावरून जाणाऱ्या ११ केव्ही विद्युत वाहिनीला झाला. यामुळे स्लॅबवर काम करत असलेले हमाल गल्ली येथील बबन वाघमारे (वय ५०) आणि यशवंत वाघमारे (वय ३३) यांना विजेचा जोरदार धक्का बसला. गंभीर जखमी झालेल्या दोन्ही मजुरांना तात्काळ स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

या अचानक ओढवलेल्या मृत्यूमुळे दोन कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. मृत बबन वाघमारे यांच्या पश्चात दोन मुले आणि एक विवाहित मुलगी असून कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावरच होती. तर, यशवंत वाघमारे यांच्या दोन लहान मुलांच्या डोक्यावरील पित्याचं छत्र हरपलं आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी उंचावर जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न या घटनेने पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. कष्टकऱ्यांचे असे बळी जाणे अत्यंत वेदनादायी आहे.

## पाटोद्यात वयोवृद्ध दांपत्याला अमानुष मारहाण

### ▸ साडेचार लाखांचा दरोडा



बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील सोनी सावरगाव येथे एका वयोवृद्ध शेतकरी दांपत्याला बेदम मारहाण करत अज्ञातांनी ४ लाख ६९ हजार रुपयांचा ऐवज लुटल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. गुरुवारी रात्री अकरा वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला असून, पाटोदा पोलीस ठाण्यात याप्रकरणी अज्ञातांविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ७५ वर्षीय शेतकरी अशोक भगवान जोशी आणि त्यांची पत्नी त्यांच्या शेतातील 'श्रम-साफल्य' या घरात झोपले होते. त्यावेळी अज्ञात दरोडेखोरांनी घराच्या मागील भिंतीवरून उडी मारून उघड्या दरवाजातून आत प्रवेश केला. या गुन्हेगारांनी कोणतीही दया न दाखवता वयोवृद्ध दांपत्याला लाकडी काठी आणि लाथाबुक्क्यांनी अमानुषपणे मारहाण केली. त्यानंतर चोरट्यांनी घरातून सोन्याचे लॉकेट, अंगठ्या, कानातील फुले, गळ्यातील पोत आणि ५५ हजार रुपयांच्या रोख रकमेसह एकूण ४ लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

या भयंकर घटनेमुळे परिसरात मोठी दहशत निर्माण झाली असून, वयोवृद्ध नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पाटोदा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भावड या प्रकरणाचा अधिक तपास करत असून आरोपींचा कसून शोध सुरू आहे.

## कौडगाव फाट्याजवळ दोन दुचाकींची जोराची धडक

### भीषण अपघातात २१ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

परळी तालुक्यातील सिरसाळा हद्दीतील कौडगाव फाट्याजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकीने दिलेल्या जोराच्या धडकेत विकास संतोष भोसले या २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या अपघातात त्याचा मित्र गंभीर जखमी झाला असून, या प्रकरणी निष्काळजीपणे वाहन चालवणाऱ्या आरोपी चालकाविरुद्ध सिरसाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवारी (१० सप्टेंबर) संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास हा अपघात घडला. विकास आणि त्याचा मित्र सोनपेठकडून सिरसाळ्याकडे येत असताना कौडगाव फाट्याजवळील देशी दारूच्या दुकानासमोर ही घटना घडली. आरोपीने त्याच्या ताब्यातील दुचाकी (क्र. डभ २२ / ४२५७) अत्यंत निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून विकासच्या दुचाकीला (क्र. डभ २२ / २१७३) समोरासमोर जोराची धडक दिली. या जीवघेण्या धडकेत विकासचा दुर्दैवी अंत झाला, तर त्याचा मित्र अरुण गायकवाड गंभीर जखमी झाला आहे.

मुलाच्या मृत्यूचा धक्का बसलेल्या विकासचे वडील संतोष बाबुराव भोसले (वय ४५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शुक्रवारी रात्री उशिरा सिरसाळा पोलिसांत भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस हवालदार देशमुख या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, ऐन तारुण्यात मुलाचा बळी गेल्याने परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

## बसस्थानकातून दागिने चोरणारी महिला ताब्यात

बीड – पाटोदा बसस्थानक परिसरात महिलेच्या बॅगेतील सोने,रोख रक्कम चोरणाऱ्या महिलेला स्थानिक गुन्हे शाखेने पथकाने गुरुवार (दि.१०) रोजी ताब्यात घेऊन तिच्याकडून १३ लाख ९७ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पाटोदा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत आरोपी सोजर सुरेश भोसले (वय ४५),रा. पारनेर, ता. पाटोदा जि. बीड ही चोरीचे सोने विक्री करण्याच्या उद्देशाने चुंबळी फाटा येथे थांबली असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने चुंबळी फाटा येथे कारवाई करून तिला ताब्यात घेत तिच्याकडून ४ तोळे ४ ग्रॅम सोने व दहा हजार रोख रक्कम हस्तगत करण्यात आली. यापूर्वी हस्तगत केलेल्या



मुद्देमालासह गुन्ह्यात चोरीस गेलेला संपूर्ण ८ तोळे ४ ग्रॅम सोने व रोख रक्कम असा एकूण १३ लाख ९७ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत,अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजित खुळे,पोनि शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि शेखर औटे,पोह अशोक दुबाले,सोमनाथ गायकवाड,बाळासाहेब सानप,आनंद मस्के,स्वाती मुंढे,श्री.नागरगोजे,पोअं अशफाक सय्यद,मनोज परजणे,अश्विनकुमार सुरवसे व चापोअं सिद्धार्थ मांजरे यांनी केली.

## बनावट दारुवर ग्रामीण पोलिसांचा छापा

बीड – मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी बीड ग्रामीण पोलिसांकडून पेट्रोलिंग सुरू असताना बनावट दारू निर्मिती करणाऱ्यांवर धडक कारवाई करण्यात आली.पोलिसांच्या पाठलागादरम्यान गोसापुरी गावाजवळ संशयितांनी चारचाकी वाहन सोडून अंधाराचा फायदा घेत पळ काढला.पोलिसांनी वाहनाची झडती घेतल्यानंतर त्यामध्ये तयार बनावट दारूसह दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळून आले.याप्रकरणी वाहनासह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



शुक्रवारी (दि.११) सपोनि बाळराजे दराडे हे एपीआय सोनवळे पोलीस हवालदार सतीश मुंडे, अजय सानप, चालक पोलीस शिपाई श्री.चव्हाण व होमगार्ड प्रशांत वीर यांच्यासह बीड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. यावेळी छत्रपती संभाजी महाराज चौकाजवळ एक चारचाकी वाहन संशयास्पदरीत्या भरधाव वेगाने जाताना दिसले. पोलिसांनी या वाहनाचा पाठलाग सुरू केला. मात्र, चालकाने वाहनाचा वेग वाढवून पळून जाण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, नामलगाव फाट्याजवळ या वाहनाची कुत्र्याला धडक झाली. त्यानंतर वाहन घोसापुरी गावाच्या दिशेने वळविण्यात आले.पोलिसांनी पाठलाग सुरूच ठेवला. घोसापुरी गावाच्या अलीकडे वाहन थांबवून त्यातील दोन इसम अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून

▸ पान 3 वर

# मराठवाडा साहित्य परिषद केजकडून आदर्श शिक्षकांचा सत्कार



केज – केज तालुक्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा मराठवाडा साहित्य परिषद केज शाखेच्यावतीने गुरुवार रोजी सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ कविता गीते कराड ,प्रोफेसर डॉ. सुनील राऊत यांना स्व. केशवराव नाळवंडीकर आदर्श शिक्षक पुरस्कार , अश्रुबा सोनवणे यांना स्व. केशवराव नळवंडीकर आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच डॉ. हनुमंत सौदागर यांना सिद्धिविनायक शैक्षणिक संस्था आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार, भागवत सोनवणे यांना सिद्धिविनायक शैक्षणिक संस्था आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार व प्रा. हनुमंत भोसले यांना सिद्धिविनायक शैक्षणिक संस्था आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. विविध पुरस्काराने सन्मानित झालेल्या शिक्षकांचा मसापच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो डॉ नवनाथ काशीद, प्रमुख पाहुणे केज मसापचे संस्थापक अध्यक्ष ईश्वर मुंडे हे होते. यावेळी उपस्थितांनी गुणवैशिष्ट्ये असलेली शिक्षक मंडळी चांगली पिढी घडवतात.विद्यार्थ्यांसाठी ज्ञानगंगा सतत वाहत ठेवणारा शिक्षक असतो.स्वयंप्रकाशीत असलेले गुरुजी कायम स्मरणात राहतात. सृजनशील शिक्षकांची आज समाजाला गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञान यामुळे नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत.

वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी शिक्षक कार्य करतात. राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने केजची मान उंचावली असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. ईश्वर मुंडे म्हणाले बीड जिल्हा गुणवत्तेची खान आहे असे मत व्यक्त केले.

डॉ काशिद म्हणाले मसापच्या विविध उपक्रमातून साहित्य विचार पुढे घेऊन जाण्याचे कार्य मसाप करत आहेत. कार्यक्रमास महादेव ढाकणे प्रा डॉ महादेव सुवर्णकार , बालासाहेब लोखंडे , दादासाहेब कराड, विक्रम डोईफोडे , श्री कोथिंबीरे , जनार्दन सोनवणे , श्रीमती कोकाटे आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक विक्रम डोईफोडे यांनी केले . सूत्रसंचालन कवी हनुमंत घाडगे यांनी केले.आभार प्रो डॉ नवनाथ काशीद यांनी केले.

# अंबाजोगाईत खळबळ: नागझरी परिसरातून तरुणाचे अपहरण

**» पत्नीच्या फिर्यादीवरून अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल**

बीड – जिल्ह्यातील अंबाजोगाई शहरात एका ३५ वर्षीय तरुणाचे अज्ञात कारणावरून अपहरण झाल्याची धक्कादायक आणि चिंताजनक घटना उघडकीस आली आहे. मंगळवारी (दि. ८ सप्टेंबर) संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास नागझरी परिसरातील राहत्या घरातून अज्ञाताने या तरुणाला फूस लावून पळवून नेले. या प्रकरणी पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अतुल गोविंद वाकडे (वय ३५, मूळ रा. बर्दापूर, सध्या रा. नागझरी परिसर, अंबाजोगाई) असे अपहरण झालेल्या तरुणाचे नाव आहे. घरातून अचानक पती बेपत्ता झाल्याने त्यांच्या पत्नी अश्विनी अतुल वाकडे (वय २६) यांनी शोधाशोध केली. मात्र, काहीही थांगपत्ता न लागल्याने त्यांनी शुक्रवारी दुपारी पोलिसांत धाव घेत रीतसर तक्रार नोंदवली. या अनपेक्षित घटनेमुळे कुटुंबाला मोठा भावनिक धक्का बसला असून परिसरात भीतीचे वातावरण आहे.
पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत तात्काळ भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १४०(३), १४२ आणि १३८ अन्वये अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस हेड कॉन्स्टेबल गाडे या प्रकरणाचा पुढील तपास करत असून, अपहरणकर्त्याचा आणि बेपत्ता अतुलचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून वेगाने तपास चक्रे फिरवली जात आहेत.

# कोरड्या दुष्काळातही पात्रुडच्या शेतकऱ्याचा उत्साह कायम; मोठ्या उत्साहात बैल पोळा साजरा



माजलगाव – बीड जिल्ह्यात यंदा पावसाअभावी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असतानाही पात्रुड येथील शेतकरीविष्णु नाना जाधव जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील, विशाल पाटील जाधव, विवेक जाधव यांनी आपल्या बैलांचा सन्मान करत मोठ्या उत्साहात बैल पोळा सण साजरा केला.

शेतकऱ्याच्या जीवनात बैलांचे असलेले महत्त्व आणि शेतीच्या कामात त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पोळ्याच्या निमित्ताने बैलांची पूजा करण्यात आली. आर्थिक अडचणी व पाण्याचे संकट असतानाही शेतकऱ्यांनी आपल्या परंपरा आणि संस्कृती जपण्याचा संदेश यावेळी दिला. या प्रसंगी गोरख चव्हाण, ग्रा.प.सदस्य अक्षय मोरे, ग्रा.प.सदस्य ऋषिकेश नाटकर, भीमा ताटे, तुषार गायकवाड आदी उपस्थित होते.

दुष्काळाची झळ सोसत असतानाही बळीराजाचा उत्साह आणि आपल्या पशुधनाप्रती असलेली कृतज्ञता आजही तितकीच जिवंत आहे, असा संदेश या पोळा सणाच्या माध्यमातून पाहायला मिळाला.

# चातुर्मास उत्सवानिम्मित सोमवारी ह.भ.प. पांडुरंग रांजवण महाराज यांचे प्रवचन

बीड – बीड शहरातील स्वराज्य नगर येथील ज्ञानेश्वरी अभ्यासक श्री.ह.भ.प. भागवताचार्य माधव महाराज डाके यांच्याकडे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही चातुर्मास उत्सव मोठ्या भक्तिमय वातावरणात व आनंदात सुरू आहे.
या चातुर्मास उत्सवात प्रत्येक सोमवारी रात्री ८.०० ते ९.०० या वेळेत बीड जिल्ह्यातील नामवंत,प्रज्ञावंत ज्ञानेश्वरी अभ्यासक व कीर्तनकार महाराजांच्या रसाळ व प्रासादिक प्रवचन सेवा आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

यावर्षीच्या चातुर्मास उत्सवातील प्रतिसोमवार प्रवचन सेवा दिनांक १४ सप्टेंबर २०२६ सोमवार रोजी ह भ प पांडुरंग महाराज रांजवण आहेर वडगाव यांची प्रवचन सेवा आयोजित करण्यात आली आहे.

सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके या फेसबुक चॅनल वरती केले जाणार आहे. याची भाविकांनी नोंद घ्यावी.

या प्रवचन सेवेचा लाभ बीड शहर व परिसरातील परिसरातील भाविक भक्तांना होत असुन जास्तीत जास्त भाविकांनी मोठ्या संख्येने सदरील प्रवचन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक श्री.ह.भ.प. माधव महाराज डाके काठवडेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# ‘माफसू’च्या विकासकामांना गती देण्याचे मंत्री पंकजा मुंडे यांचे निर्देश

**शिक्षक-शिक्षकेत्तर पदभरती, पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांचे विद्यावेतन व शुल्क संरचनेचा घेतला आढावा**




मुंबई – पशुवैद्यक विज्ञान व पशुसंवर्धन पदवी (बी.व्ही.एससी. अँड ए.एच.) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना इतर वैद्यकीय शाखांप्रमाणे हे विद्यावेतन १८ हजार रुपये करण्याबाबतचा प्रस्तावाच्या ४ कोटी १२ लाख रूपये करण्याबाबतच्या प्रस्तावाला आगामी मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता घेण्यासाठी कार्यवाही करावे.विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावून विद्यार्थ्यांना हॉस्टेल सह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले.

मंत्रालयात महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरच्या (च–ऋ्रण) शैक्षणिक, प्रशासकीय तसेच पायाभूत सुविधांशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांचा पशू व मत्स्य संवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला.यावेळी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे कुलगुरू डॉ.नितीन पाटील,अधिष्टाता डॉ शिरीष उपाध्ये,कुलसचिव मोना ठाकूर,उपकुलसचिव डॉ.ए.पी.गांवडे, सहसचिव नि.भा.मराळे यावेळी उपस्थित होते.

मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदांच्या भरती प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला यावेळी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची भरती गतीने कार्यवाही करण्यात यावी. भारतीय पशु चिकित्सा परिषदेच्या (तउख) मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक शिक्षकवर्ग उपलब्ध करून देण्यासाठी या भरती प्रक्रियेला प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा व बांधकाम प्रकल्पांची कामांची सद्यस्थिती तपासून पहा. शैक्षणिक इमारती, रुग्णालये तसेच वसतिगृहांच्या बांधकाम प्रकल्पांमध येमुंबई,नागपूर,परभणी,शिरवळ,उदगीर,व रूड,उदगीर, मोर्शी येथील समावेश आहे या कामांचे प्रगतीनिहाय अहवाल करून ही कामे गतीने करा अशा सूचना त्यांनी केल्या. विद्यार्थ्यांचे विद्यावेतन व इंटर्नशिप भत्ता तसेच पशुवैद्यकीय व दुग्ध तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या शुल्क संरचनेबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित प्रकरणांमध्ये आवश्यक कार्यवाही वेगाने पूर्ण करावेत.विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावणे, विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, पायाभूत सुविधा व बांधकाम प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करणे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची भरती प्रक्रिया पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने राबवावे. यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने आणि कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले.

# जय किसान गणेश मंडळाच्या खो-खो स्पर्धेत मेंदवाडी, कांडेवाडी संघ विजेते




किल्लेधारूर – जय किसान गणेश मंडळाच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय खो–खो स्पर्धेत मुलींच्या गटात मेंदवाडी, तर मुलांच्या गटात कांडेवाडी संघाने प्रथम क्रमांक मिळविला. स्पर्धेला विद्यार्थी, पालक आणि क्रीडाप्रेमींचा चांगला प्रतिसाद मिळाला.

जय किसान गणेश मंडळाच्या वतीने (ता. १०) रोजी मुला मुलींचे शालेय तालुका स्तरीय खो–खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत २० पेक्षा अधिक संघांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेत मुलींच्या गटात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, मेंदवाडीच्या संघाने विजेतेपद मिळविले. तर सोनीमोहा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. मुलांच्या गटात आदिवासी आश्रमशाळा, कांडेवाडी संघाने प्रथम क्रमांक मिळविला, तर ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय, धारूर संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. स्पर्धेतील सामन्यांमध्ये खेळाडूंनी चपळाईने खेळ करत प्रतिस्पर्धी संघांना चांगली लढत दिली. विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना स्थानिक पातळीवर संधी मिळावी, या उद्देशाने मंडळाच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून नगरसेवक बिभीषण गायकवाड,प्रमुख म्हणून डॉ प्रा.गोपाळ काकडे, उपप्राचार्य जोगदंड सर बप्पा दरेकर,समवेत आदी उपस्थित होते.खो–खोच्या सामन्यांत विद्यार्थ्यांची सांघिक कामगिरी, खेळातील शिस्त आणि विजयासाठीची धडपड पाहायला मिळाली. विजेत्या आणि उपविजेत्या संघांचे मंडळाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी नियमितपणे अशा स्पर्धांचे आयोजन होणे गरजेचे आहे. या स्पर्धेतून विद्यार्थ्यांना आपल्या खेळाचा सराव आणि अनुभव मिळाला. मंडळाच्या या उपक्रमाचे शिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमींनी कौतुक केले.

मंडळाच्या वतीने वर्षभर सातत्याने सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येते,नागरिकांना या उपक्रमाचा फायदा व्हावा यादृष्टीने याचे आयोजन केले जाते.

हे पत्रक संपादक, मुद्रक, मालक व प्रकाशक अभिजीत नानासाहेब जगताप यांनी योगेश्वरी मुद्रणालय, अंबाजोगाई येथे छापून दैनिक विवेक सिंधु कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल (संकुल क्र.४३,४४) अंबाजोगाई पिन–४३१५१७ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले आहे. संस्थापक संपादक – प्रा.नानासाहेब गाठाळ ✻ संपादक- अभिजीत जगताप ✻ वृत्तपत्राचा नोंदणी क्र.६५७८८/८५ ✻ फोन–२४७२७०, मो :–९७६४०३३१११,९७६५५०००८८

## बनावट दारूवर...पान १ वरून

झाले.यानंतर पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता शरीरास घातक असलेले तसेच रासायनिक पदार्थांपासून बनावट दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य,तयार बनावट दारू व इतर साहित्य आढळून आले. या कारवाईनंतर पोलिसांनी संबंधित व्यक्तींची माहिती घेत घोसापुरी गावातील एका व्यक्तीच्या घराजवळील पत्र्याच्या शेडची झडती घेतली.या शेडमध्ये आरएस कंपनीच्या रिकाम्या बाटल्या, सील-पॅक स्टिकर्स तसेच बनावट दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळून आले. पोलिसांनी चारचाकी वाहन क्रमांक एमएच ०४ एनएच १०६५ तयार बनावट दारू, दारू निर्मितीचे साहित्य, रिकाम्या बाटल्या, सील-पॅक स्टिकर्स आदी मुद्देमाल जप्त केला आहे.या प्रकरणातील पसार झालेल्या संशयितांचा शोध सुरू असून पुढील तपास बीड ग्रामीण पोलीस करीत आहेत.

## गणपतीत बरसणार...पान १ वरून

**या जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' जारी**

राज्यातील हवामानात वेगाने बदल होत असून अनेक जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे:

१२ सप्टेंबर: मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, धुळे, नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, बुलढाणा, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा.

१३ सप्टेंबर: मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, सातारा, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, जालना, बीड, धाराशिव, परभणी, हिंगोली, बुलढाणा, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांना यलो अलर्ट.

१४ सप्टेंबर: नाशिक आणि पुणे (घाटमाथा), अहिल्यानगर तसेच रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

पावसाचा हा अंदाज खरा ठरल्यास, ऐन सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांच्या माना टाकलेल्या पिकांना मोठे जीवदान मिळणार असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही काही अंशी सुटण्याची आशा निर्माण झाली आहे. या काळात नागरिकांनी विजांच्या कडकडाटापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी योग्य ती काळजी घेण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

## जिल्हास्तरीय हॉकी...पान ४ वरून

मुंडे, अनुष्का जाधव, अक्षता श्रीडोळे, योगेश्वरी गंगणे ,अस्मिता सावरे, गौरी जाधव ,अवंती लोमटे ,भक्ती देशमुख ,हर्षदा धारेकर ,श्रुती शिंदे ,शितल कदम, वैभवी औताडे, ज्ञानेश्वरी चव्हाण ,रेणुका खाडे, अनन्या निर्मळे यांचा समावेश होता .

विजयी संघाचे अभिनंदन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी चंद्रशेखर बर्दापूरकर, गणपत व्यास, ड जगदीश चौसाळकर, कमलाकरराव चौसाळकर, डॉ . शैलेश वैद्य , प्रा . जयश्री मोटेगावकर, ड. कल्याणी विर्धे , प्रा . माणिकराव लोमटे , प्रा भीमाशंकर शेटे, प्रा . गोळेगावकर , सय्यद पाशूमियाँ,रमण सोनवळकर, लंकेश वेडे , प्रा अभिजित लोहिया, प्रताप पवार, अंगद कराड यांनी केले . मुख्याध्यापिका स्मीता धावडकर, पदाधिकारी , शिक्षक प्रतिनिधी , शिक्षक व कर्मचार्यांनी विजयी संघाचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले . खेळाडूंना मार्गदर्शन क्रीडा विभाग प्रमुख अंजली रेवडकर यांनी केले .

## कोरडा दुष्काळ जाहीर...पान ४ वरून

अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे नुकसान झाले होते. त्यामुळे अगोदरच आर्थिक अडचनीला सामोरे जात असताना यावर्षीही समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत पावसाअभावी पिकांच्या नुकसानीचे पंचनामे स्तरावर सुरू करण्यात आलेले नसल्याने तालुक्यातील शेतकऱ्यात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाने लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खरीप पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करावेत. कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख नुकसान भरपाई द्यावी. प्रशासकीय स्तरावर सर्व प्रक्रिया पूर्ण करून शेतकऱ्यांना शासकीय मदत देऊन दिलासा देण्याचा मागणीचे निवेदन आडस येथील तहसीलदार अशोक भंडारे व तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांना दिले आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शिवरुद्र आकुसकर, गजानन देशमुख, बालासाहेब ढोले, ओमकार आकुसकर, सचिन आकुसकर, संतोष मेहत्रे, महादेव ढोले, शिवराज आकुसकर व नागनाथ आकुसकर यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## डॉक्टर जीवनदान देतात...पान ४ वरून

फिजिओथेरपिस्ट त्यांना ते जीवन पुन्हा आनंदाने आणि हालचालींसह जगण्याची ताकद देतात,असे प्रतिपादन आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

वर्ल्ड फिजिओथेरपी या जागतिक संघटनेच्या ८ सप्टेंबर १९५१ रोजी झालेल्या स्थापनेचे औचित्य साधून आदित्य एज्युकेशन ग्रुप कॅम्पसमध्ये जागतिक फिजिओथेरपी दिन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला. ९ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता आयोजित या कार्यक्रमात आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आजार तसेच पक्षाघात यांसारख्या गंभीर आजारांवर प्रतिबंध, व्यवस्थापन आणि पुनर्वसनात फिजिओथेरपीचे महत्त्व विशद करणारे प्रभावी पथनाट्य सादर केले. कार्यक्रमाचे उद्घाटन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते पार पडले. व्यासपीठावर आदित्य कृषीचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य आयुर्वेदचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य दंत महाविद्यालयाचे डॉ. हिमांशु श्रीवास्तव, डॉ. विकास गर्जे, प्रा. प्रदीप काठोळे व प्रा. बालाजी बाहीरवाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. आदिती सारडा म्हणाल्या, आजच्या धावपळीच्या युगात चुकीची जीवनशैली आणि व्यायामाच्या अभावामुळे लहान वयातच सांधेदुखी, पाठदुखीचे आजार वाढले आहेत. औषध व शस्त्रक्रियेविना पुन्हा निरोगी बनवण्याचे काम फिजिओथेरपी करते. डॉक्टर जीवनदान देतात, पण फिजिओथेरपिस्ट ते जीवन हालचालींसह आनंदाने जगण्याची ताकद देतात. स्ट्रोक किंवा हृदयविकारानंतर रुग्णाला सामान्य आयुष्यात आणण्यासाठी फिजिओथेरपिस्टचे मार्गदर्शन संजीवनी ठरते असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमास कॅम्पसमधील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. बालाजी बाहीरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रा. रामेश्वर ढोबळे, डॉ. धनश्री टाकसाळे, डॉ. संदेश दळवी, डॉ. श्वेतजा चोपडे, डॉ. रजनी शिंदे यांच्यासह विविध संस्थांचे प्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. आभार तृतीया वर्षाची विद्यार्थिनी रक्षंदा मोमीन हिने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## माफसूच्या विकासकामांना...पान ४ वरून

प्रस्तावाला आगामी मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता घेण्यासाठी कार्यवाही करावे.विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावून विद्यार्थ्यांना हॉस्टेल सह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले.

मंत्रालयात महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरच्या (च-ऋक्ष) शैक्षणिक, प्रशासकीय तसेच पायाभूत सुविधांशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांचा पशू व मत्स्य संवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला.यावेळी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे कुलगुरू डॉ.नितीन पाटील,अधिष्ठाता डॉ शिरीष उपाध्ये,कुलसचिव मोना ठाकूर,उपकुलसचिव डॉ.ए.पी.गांवडे, सहसचिव नि.भा.मराळे यावेळी उपस्थित होते.

मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदांच्या भरती प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला यावेळी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांची भरती गतीने कार्यवाही करण्यात यावी. भारतीय पशु चिकित्सा परिषदेच्या (तउख) मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक शिक्षकवर्ग उपलब्ध करून देण्यासाठी या भरती प्रक्रियेला प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा व बांधकाम प्रकल्पांची कामांची सद्यस्थिती तपासून पहा. शैक्षणिक इमारती, रुग्णालये तसेच वसतिगृहांच्या बांधकाम प्रकल्पांमध्येमुंबई,नागपूर,परभणी,शिरवळ,उदगीर,वरूड,उदगीर, मोर्शी येथील समावेश आहे या कामांचे प्रगतीनिहाय अहवाल करून ही कामे गतीने करा अशा सूचना त्यांनी केल्या.

### जाहिरनामा

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत**

**मा.श्रीमती प्रियंका ज.लिगाडे, २ रे सह.दिवाणी न्यायाधीश क. स्तर अंबाजोगाई यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर -५७२/२०२६**

**कलावती वि.निल**

अर्जदार - १) कलावती जबरचंद मोदी, वय ८९ वर्षे, धंदा- घरकाम, रा. गुरूवार पेठ, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड, २) अनिल जबरचंद मोदी, वय ६३ वर्षे, धंदा- व्यापार, रा. गुरूवार पेठ, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड, ३) सुनिल जबरचंद मोदी, वय ६१ वर्षे, धंदा- व्यापार, रा. गुरूवार पेठ, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड ह.मु. २५२/१/क.ई वॉर्ड नागाळापार्क गुणवंत अपार्टमेंट, कलेक्टर ऑफिस रोड, कोल्हापुर जि.कोल्हापुर, ४) मंगलेश्वरी मोहनप्रकाश जयस्वाल, वय ६६ वर्षे, धंदा- घरकाम, रा.हाऊस नं.८/१/१५१, शिवाजी नगर, सिंकदराबाद, तेलंगणा राज्य, ५) लता रमेश जयस्वाल, वय ६४ वर्षे, धंदा- घरकाम, रा. ३०८,प्लेसंट पार्क,हेदगुडा हैद्राबाद, तेलंगणा राज्य,

विरूध्द

निरंक

अर्जदार क्र. १ यांचे पती, अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील मयत नामे जबरचंद रूपलाल मोदी हे दिनांक - २३/०३/१९९७ रोजी मयत झाले आहे. त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदारास शासकीय व निमशासकीय कारणासाठी ते मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी हया न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर न्यायालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार यांना देण्यात येईल.

पूढील तारीख - १२/१०/२०२६

आज दिनांक- ०९ माहे ०९ सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर अंबाजोगाई

# मोफत कृत्रिम अवयव वाटपाचा दिव्यांगांनी लाभ घ्यावा : अमरसिंह पंडित



गेवराई - महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व.अजिदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जनसेवा सप्ताहामध्ये शारदा प्रतिष्ठान, शारदा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आणि साधू वासवानी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात सहभाग नोंदविलेल्या दिव्यांगांच्या हात व पायांची तपासणी करण्यात आली होती. तज्ञांच्या सल्ल्यानुसार पात्र दिव्यांगांना रविवार, दि.१३ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे मोफत कृत्रिम हात व पाय यांचे वाटप होणार आहे. गरजू दिव्यांग बांधवांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केले आहे. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या पहिल्या जयंतीनिमित्त माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी गेवराईत भव्य जनसेवा सप्ताहाचे आयोजन केले होते.

शारदा प्रतिष्ठान गेवराई, शारदा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट आणि साधू वासवानी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराला मोठा प्रतिसाद मिळाला होता. तज्ञ डॉक्टरांनी केलेल्या तपासणीमध्ये ज्या दिव्यांगांना कृत्रिम हात व पाय बसविणे शक्य आहे त्यांची मोजमापे त्यावेळी घेण्यात आली होती. यापूर्वी तपासणी केलेल्या पात्र दिव्यांग बंधु-भगिनींना रविवार, दि.१३ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे मोफत कृत्रिम हात व पाय यांचे वाटप करण्यात येणार आहे. यावेळी गरजू दिव्यांग बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केले आहे. शारदा प्रतिष्ठानकडून सातत्याने समाजोपयोगी उपक्रमांचे यशस्वी आयोजन केले जाते. गरजू दिव्यांग बंधु-भगिनींना गेवराई सारख्या ग्रामीण भागात अतिशय अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून फायबरपासून तयार केलेले वजनाने हलके व मजबुत लाखो रुपये किंमतीचे कृत्रिम अवयव मोफत उपलब्ध करून देण्याचे काम या शिबीराच्या माध्यमातून करण्यात येत आहे. स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त या शिबीराचे आयोजन होत असून दिव्यांग बांधवांना खऱ्या अर्थाने स्वतःच्या पायावर उभा करण्याचे काम या माध्यमातून शिवछत्र परिवार करत आहे. या कार्यक्रमाला आ. विजयसिंह पंडित ंच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पात्र दिव्यांग बंधु-भगिनींनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केले आहे.

## कचरा टाकण्याच्या वादातून....पान ४ वरून

कचरा टाकण्याच्या कारणावरून आणि 'आमच्यावर खोट्या केसेस का करतोस' असा जाब विचारत आरोपींनी वाद उकरून काढला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यानंतर सुधाकर शिंदे, भानुदास शिंदे, भरत शिंदे, ऋषीकेश शिंदे, विमल शिंदे, सुमन शिंदे आणि वैशाली शिंदे या सर्व आरोपींनी संगनमत करून बाबासाहेब आणि त्यांच्या नातेवाईकांना लाथाबुक्क्यांनी, काठीने व दगडाने बेदम मारहाण केली. आरोपींनी त्यांना अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकीही दिली. या हिंसक घटनेमुळे गावात तणावाचे वातावरण असून पोलीस शिपाई पैठणे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## जमिनीच्या वादातून...पान ४ वरून

मोठा दगड उचलून तानाजी यांच्या डोक्यात घातला आणि त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली.

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तानाजी यांनी या जीवघेण्या हल्ल्यानंतर तात्काळ पोलीस ठाणे गाठले. याप्रकरणी त्यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार बालाजी आणि ओमकार शिंदे या दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या हिंसक घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## लिंबागणेश येथे कुणबी...पान ४ वरून

दाखले, जन्म-मृत्यू नोंदी, रहिवासी पुरावा, उपलब्ध जुन्या महसुली नोंदी, हैदराबाद गॅझेटमधील नोंदी, विहित नमुन्यातील स्वयंघोषणापत्र व शपथपत्र आदी कागदपत्रांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.

शासनाच्या निर्देशानुसार प्रशासन अधिक लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी ही विशेष शिबिरे घेण्यात येत आहेत. शिबिराच्या कालावधीत जुन्या महसुली नोंदी व इतर पुरावे शोधणे, नागरिकांकडून प्राप्त अर्जांची छाननी करणे तसेच पात्र अर्जदारांना नियमानुसार प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

दरम्यान, लिंबागणेश महसूलमंडळाच्या अंतर्गत पूर्वी असलेल्या मुळुकवाडी, मसेवाडी, सोमनाथवाडी, बेलगाव, पिंपरनई, पोखरी (घाट), फुकेवाडी यासह आठ गावांतील जुने महसुली रेकॉर्ड तहसील कार्यालयात जळाल्याने नमुना क्रमांक ३३ व ३४ मधील नोंदी उपलब्ध नसल्याचा मुद्दा यावेळी ऐरणीवर आला. रेकॉर्डच उपलब्ध नसल्यास या गावांतील नागरिकांच्या कुणबी नोंदी शोधणार कशा, असा सवाल मराठासेवक डॉ. गणेश ढवळे, महारूद्र वाणी वमुळुकवाडीचे सरपंच रामकिसन कदम यांनी उपस्थित केला. संबंधित गावांतील जुन्या नोंदींचा पर्यायी स्रोत शोधून नागरिकांना पुरावे उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना करावयात, अशी मागणी त्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याकडे केली.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर...पान ४ वरून

शेतकरी आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्रआमटे यांनी केले आहे.

शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जिल्ह्यातील गावोगावी शेतकरी बैठका घेऊन शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांबाबत जागृत करण्यात येत आहे. नाळवंडी येथे मोर्चाची पहिली बैठक घेण्यात आली. त्यानंतर राक्षसभुवन, कुक्कडगाव, पिंपळगाव मांजरा, म्हाळसापूर, ईट, गंगनाथवाडी, उमरद खालसा आणि वाकनाथपूर येथे शेतकरी बैठका घेण्यात आल्या.

वाकनाथपूर येथे झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता 'हलगी बजाव' आंदोलन करण्याचा निर्धार केला. पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून एकरी ४० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, मागील अतिवृष्टीतील घोषणेनुसार हेक्टरी १७ हजार रुपये पीकविमा द्यावा, २०२० सालचा थकीत पीकविमा तात्काळ जमा करावाआणि जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा, अशा मागण्या यावेळीकरण्यात आल्या. या मागण्यांकडे शासन व प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने देण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या न्याय्यहक्कांसाठी होणाऱ्या या आंदोलनात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, डॉ. गणेश ढवळे, अशोकराव येडे, बाळासाहेब मोरे, कवी ज्ञानेश्वर राऊत, हनुमान घोडके, अर्जुन सोनवणे, रामधन जमाले, भास्कर खाकरे, महादेव खाकरे, महादेव घोडके, प्रल्हाद दर्पे, प्रल्हाद खाकरे, शिवाजी कानडे, अभिमान खाकरे, संतोष घाडगे, शेख आलेख, शेख कबीर, विक्रम घाडगे, दिगंबर खाकरे, दिलीप घाडगे, विक्रम खाकरे यांच्यासह आदी शेतकरी उपस्थित होते.

## कोरडा दुष्काळ...पान ४ वरून

कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात तालुक्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी एक लाख रुपये मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे. सोबतच, खरीप २०२५ ची थकीत विम्याची रक्कम तात्काळ खात्यात जमा करावी, बंद केलेले पीक विमा ट्रिगर पुन्हा सुरू करा, चारा छावण्या सुरू कराव्यात आणि यंदाचा पीक विमा मंजूर करावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. प्रशासनाने यावर लवकरात लवकर ठोस निर्णय न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा गजानन देशमुख, शिवरुद्र आकुसकर, बाळासाहेब ढोले, संतोष म्हेत्रे, ओमकार आकुसकर, सचिन आकुसकर, बंटी आकुसकर, नागनाथ आकुसकर आणि शिवराज आकुसकर यांच्यासह आडस परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

दैनिक
# विवेक सिंधु
रविवार, दि.१३ सप्टेंबर २०२६ पान ४

### माफसूच्या विकासकामांना गती देण्याचे मंत्री पंकजा मुंडे यांचे निर्देश

मुंबई –पशुवैद्यक विज्ञान व पशुसंवर्धन पदवी (बी.व्ही.एससी. अँड ए.एच.) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना इतर वैद्यकीय शाखांप्रमाणे हे विद्यावेतन १८ हजार रुपये करण्याबाबतचा प्रस्तावाच्या ४ कोटी १२ लाख रूपये करण्याबाबतच्या

पान ३ वर

### डॉक्टर जीवनदान देतात, तर फिजिओथेरपिस्ट आनंदाने जगण्याची ताकद : डॉ. आदिती सारडा

बीड – धावपळीच्या आणि बदलत्या जीवनशैलीमुळे आज लहान वयातच गंभीर आजार वाढले आहेत. अशा वेळी औषध अथवा शस्त्रक्रियेविना रुग्णाला पुन्हा स्वावलंबी बनवण्याचे महान कार्य फिजिओथेरपी करते. डॉक्टर रुग्णाला जीवनदान देतात, पण

पान ३ वर

## कोरडा दुष्काळ जाहीर करा

### आडस ग्रामस्थांची मागणी



आडस – केज तालुक्यातील आडस परिसरात मागील ४० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप पिके जळून खाक झाली आहेत. मागच्या वर्षीही झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत असताना, यंदाही पाऊस न पडल्याने उभी पिके डोळ्यांदेखत नष्ट झाली. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन पिकांचे पंचनामे सुरू करुन कोरडा दुष्काळ जाहीर करा अशी मागणी निवेदनाद्वारे तहसीलदार आणि कृषी अधिकारी यांना केली.

आडस (ता.केज ) येथील शेतकऱ्यांच्या वतीने तहसीलदार,केज आणि तालुका

पान ३ वर

## जमिनीच्या वादातून मजुराला अमानुष मारहाण

### डोक्यात दगड घालून केला जीवघेणा हल्ला

अंबाजोगाई – शहरातील पोखरी रोडवरील तथागत चौकात जमिनीच्या कारणावरून एका मजुराला बापा–लेकाने अमानुष मारहाण केल्याचा संतापजनक प्रकार शुक्रवारी सकाळी उघडकीस आला आहे. जमिनीचे हक्क मुलीच्या नावावर करण्यासाठी दबाव टाकत डोक्यात दगड घालून तरुणाला गंभीर जखमी करण्यात आले असून, अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



तानाजी विजयकुमार वाघमारे (वय ३८, सध्या रा. बलुतेचा मळा, अंबाजोगाई) असे जखमी फिर्यादीचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, शुक्रवारी (११ सप्टेंबर) सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास तानाजी हे तथागत चौकात असताना बालाजी शिंदे आणि त्याचा मुलगा ओमकार शिंदे (दोघे रा. राधानगरी, अंबाजोगाई) यांनी संगनमत करून त्यांना गाठले. 'तुझ्या नावावर असलेली जमीन माझ्या मुलीच्या नावावर करून दे' असा तगादा लावत आरोपींनी तानाजी यांना अश्लील शिवीगाळ केली व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण सुरू केली. यावेळी ओमकार शिंदे याने रस्त्याच्या कडेला पडलेला

पान ३ वर

## वडवणी तालुक्यातील तरुणाचे अपहरण; अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

बीड – बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील मोरवड येथील मूळ रहिवासी असलेल्या २९ वर्षीय तरुणाचे अज्ञात कारणावरून अपहरण झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तरुणाच्या वृद्ध आईने दिलेल्या फिर्यादीवरून वडवणी पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनेश तुकाराम मुजमुले (वय २९, मूळ रा. मोरवड, सध्या रा. मोशी, पुणे) असे अपहरण झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, गुरुवारी (१० सप्टेंबर) सकाळी अकरा वाजेच्या सुमारास हरिश्चंद्र पिंप्री येथून दिनेशला अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवून नेले. या अनपेक्षित घटनेमुळे कुटुंबाला मोठा धक्का बसला असून, दिनेशची आई कौशल्या तुकाराम मुजमुले (वय ६०) यांनी शुक्रवारी दुपारी वडवणी पोलिसांत धाव घेत रीतसर तक्रार नोंदवली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी तात्काळ दखल घेत भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १४०(३) अन्वये अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस हेड कॉन्स्टेबल ढोबळे हे पुढील तपास करत असून, अपहरणकर्त्याचा आणि दिनेशचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून कसून प्रयत्न केले जात आहेत.

### कचरा टाकण्याच्या वादातून पिंपळा येथे एकाच भावकीत राडा; सात जणांवर गुन्हा दाखल

बीड – बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील पिंपळा येथे घरासमोर कचरा टाकण्याच्या क्षुल्लक कारणावरून एकाच भावकीतील सदस्यांमध्ये तुंबळ हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शुक्रवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास घडलेल्या या मारहाण प्रकरणी अंभोरा पोलीस ठाण्यात एकाच कुटुंबातील सात जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाबासाहेब विठ्ठल शिंदे यांनी या प्रकरणी अंभोरा पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, घरासमोर

पान ३ वर

## जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत योगेश्वरी कन्या शाळा प्रथम




अंबाजोगाई (प्रतिनिधी ) महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि बीड जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय नेहरू कप हॉकी स्पर्धेच्या महिला गटात येथील गोदावरी कुंकूलोळ योगेश्वरी कन्याशाळेच्या हॉकी संघाने प्रथम पारितोषिक पटकावले .

या संघात राधिका घोडके ,वैष्णवी

पान ३ वर

## कोरडा दुष्काळ जाहीर करावा; आडस येथील शेतकऱ्यांची तहसीलदारांकडे मागणी

केज – खरीपाच्या पेरणीनंतर मागील दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने तालुक्यातील शेतर्क़्यांच्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने केज तालुका हा कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याच्या मागणीचे निवेदन शुक्रवारी दि.११ तहसीलदार अशोक भंडारे व तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांना दिले आहे.



खरीपाच्या पेरणीला समाधानकारक पाऊस झाला नसताना शेतर्क़्यांनी पाऊस पडेल या अपेक्षेने परिस्थितीत पेरणी उरकली. मात्र मागील दीड महिन्यापासून तालुक्यात पावसाचा खंड पडलेला आहे. त्यामुळे आडससह संपूर्ण केज तालुक्यातील शेतर्क़्यांच्या खरीपाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मागील वर्षी झालेल्या

पान ३ वर

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १६ सप्टेंबरला शेतकरी हलगी बजाव आंदोलन

### दुष्काळ नुकसान भरपाई, पिक विम्यासाठी आंदोलनात सहभागी व्हा : राजेंद्र आमटे



बीड – दुष्काळा मुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले असून सोयाबीन, कापूस व तूर पिकांचा अक्षरशः धुराळा झाला आहे. तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

त्यामुळे नुकसानीचे तातडीने पंचनामे करून एकरी ४० हजार रुपये नुकसानभरपाई देण्यात यावी,मागील अतिवृष्टीतील घोषणेनुसार हेक्टरी १७ हजार रुपये पीकविमा तसेच २०२० सालचा थकीत पीकविमा तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा, या प्रमुख मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य 'हलगी बजाव'

पान ३ वर

## लिंबागणेश येथे कुणबी प्रमाणपत्र विशेष शिबिर

### तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे मार्गदर्शन; ८ गावांचे महसुली रेकॉर्ड जळाल्याने कुणबी नोंदी शोधण्याचे आव्हान

लिंबागणेश – मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हैदराबाद गॅझेट लागू करण्याची घोषणा केली आहे. मराठा समाजातील नागरिकांना कुणबी, मराठा–कुणबी व कुणबी–मराठा जात प्रमाणपत्र सुलभतेने व विनाविलंब मिळावे, यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत दि. ११ ते १७ सप्टेंबरदरम्यान जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळांच्या स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

याच अनुषंगाने शुक्रवार, दि.



११ सप्टेंबर रोजी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात कुणबी– मराठा जात प्रमाणपत्रासाठी विशेष मार्गदर्शन व अर्ज स्वीकृती शिबिर घेण्यात आले. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरास लिंबागणेश महसूल मंडळाधिकारी उज्वला राऊत, तलाठी शेख गफुर, ग्रामपंचायत अधिकारी दत्ता नागरे, सरपंच बालासाहेब जाधव,प्रमोद कोळपकर (तलाठी बोरखेड), विपुल बनकर (तलाठी मुळुकवाडी, बेलखंडी पाटोदा), नारायण दराडे (तलाठी अंजनवती), लिंबागणेश महसुल मंडळातील सर्व ग्राममहसुल अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, पोलिस पाटील व महसूल सेवक उपस्थित होते. आवश्यक आवश्यक कागदपत्रांबाबत का ग द प त्रां बा ब त का ग द प त्रां बा ब त तहसीलदारांचे मार्गदर्शन तहसीलदारांचे मार्गदर्शनतहसीलदारांचे मार्गदश न कुणबी, मराठा–कुणबी व कुणबी –मराठा जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांबाबत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. यामध्ये वंशावळ, महसुली पुरावे, शालेय

पान ३ वर

## केज रोटरीच्या वतीने गौरी सजावट स्पर्धेचे आयोजन

केज : प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रोटरी क्लब ऑफ केज यांच्या वतीने गौरी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेचे परीक्षण शुक्रवार दि १८ सप्टेंबर व शनिवार दि १९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंतच्या वेळेत केले जाईल. सजावटीसाठी यावर्षी सामाजिक ऐक्य, पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, महिला सक्ष्मीकारण व पारंपारिक सजावट इत्यादी विषय राहणार आहेत. या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी (परिवारांतील एका व्यक्तीने) आपले नांव, पूर्ण पत्ता, मोबाईल नंबर व परीक्षणासाठी अनुकूल दिवस आणि वेळ इत्यादी माहितीसह आपले प्रवेश गुरुवार दि १७सप्टेंबर २०२६पूर्वी रोटरी क्लब ऑफ केज कडे पाठवणे बंधनकारक आहे. या स्पर्धेत केज शहरातील जास्तीत जास्त गौरी सजावट प्रेमीनी सहभागी व्हावे असे आवाहन रोटरी क्लब ऑफ केज चे अध्यक्ष असरार खुरेशी, सचिव हनुमंत भोसले व प्रोजेक्ट चेअरमन अरुण अंजान आणि मंगेश नेहरकर, दादा जमाले पाटील यांनी केले आहे.

प्रवेश व संपर्कासाठी हनुमंत भोसले (९४२३७३३८८८), अरुण अंजान ( ९४२०६ ५८८११ ), मंगेश नेहरकर ( ९७६६५ ०५८५६) व दादा जमाले पाटील (९८२३७७१३३३ ) यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन केज रोटरीच्या वतीने करण्यात आले आहे.